मराठी

असल इंद्रजाल

(भाग १ ते १६)

श्री. गणेशचन्द्र विद्यालंकार

सुखसागर पुस्तकालय, मुंबई २.

किंमत ४ रुपये

: प्रकाशन :

दयाळजी पुरुषोत्तम

सुखसागर पुस्तकालय

दादीशेठ अग्यारी लेन, मुंबई २.

प्रथमावृत्ति ऑगस्ट १९५६

द्वितीयावृत्ति १९५९

तृतीयावृत्ति १९६२

चतुर्थावृत्ति १९६३

— मुद्रक —

ना. अ. मेहेंदळे

जीवन मुद्रणालय,

५५१ बधवार, पुणें २

अनुक्रमणिका

—— ० ——

धूमावती






भैरव



दुर्गा

तारा





रामभगवणाजी अराक


सरस्वती



भुवनेश्वरी

भाग १ ला

साधना

मंगलाचरण

वन्दे देव उमापति सुरगुरुम् जगत्कारणम् ।
वन्दे पन्नगभूषणं मृगधरम् वन्दे पशूनाम्पतिम् ॥
वन्दे सूर्यशशांक वह्निनतनयम् वन्दे मुकुन्दप्रियम् ।
वन्दे भक्त जनाश्रयं च वरदम् वन्दे शिवं शंकरम् ॥

शिव-पार्वती संवाद

ॐ नमः शिवाय

एकदां भगवान् शंकर कैलासावर समाधिस्त बसले होते. त्यांची समाधि संपली. त्यांनीं डोळें उघडून पाहिलें. भोंवतालीं रम्य वातावरण होतें. आणि जगन्माता पार्वती देवी समोर बसली होती. तिनें हास्यवदनानें कैलासपतींचें स्वागत केलें; आणि कैलासपतींनींही हंसतमुखानें त्याचा स्वीकार केला.

पार्वती— हे शंकर सदाशिवा! भोलेनाथ! पतिराजा!

जगद्गुरो! देवाधिदेवा! माझ्या प्रणामाचा स्वीकार करावा.

शंकर– पार्वती ! तथास्तु ! काय इच्छा आहे बरें तुझी ? सांग. ती पूर्ण होईल.

पार्वती– हे भक्तवत्सल ! दीनबंधो ! आपण फार दयाळू आहांत, आणि आपण अनेक विद्यांचे ज्ञाते आहांत, विशाल शक्तीचे प्रणेते आहांत. म्हणून आज आपणापासून एका महाविद्येचें ज्ञान घ्यावें असें माझ्या मनांत आलें आहे.

शंकर– प्रिय पार्वती ! सांग. कोणती विद्या तुला हवी ?

पार्वती– पतिदेवा ! आज आपण मला इंद्रजालविद्या कथन करावी, अशी आपल्या चरणीं विनंति आहे.

शंकर-- ठीक आहे. पण अगोदर मला सांग कीं, ही विद्या घेण्याचें तुझें प्रयोजन काय ?

पार्वती-- जगद्गुरो ! ह्या विद्येनं अनेक गोष्टी साध्य होतात. ही विद्या फार विशाल आहे. ती कल्याणकारी आहे. मनुष्यमात्राचें दुःख हरण करण्यासाठीं ही विद्या सर्वोपकारी असून त्वरित फलदायी आहे. हें मला माहीत असल्यामुळें ती आपण मला कथन करावी अशी नम्र प्रार्थना आहे.

शंकर-- हे परमप्रिये ! मनमोहिनी पार्वती ! तूं फार चतुर आहेस. इंद्रजाल विद्या ही मानवकल्याणकारी विद्या आहे. तिच्या साधनेनें दुःखी जनांचें दुःख दूर करतां येतें. शत्रूचा नाश करतां येतो. आतां मी तुला इंद्रजाल विद्या कथन करतों ती तूं लक्ष लावून ऐक.

आणि मग श्रीशंकर कैलासवतींनीं इंद्रजाल विद्या कथन

करायला सुरुवात केली. ते म्हणाले.----

हे सती पार्वती ! ऐक--ही विद्या लोककल्याणार्थ मी तुला कथन करीन आहें.

इंद्रजाल विद्या ही सर्वश्रेष्ठ विद्या आहे. ती त्रिवार सत्य विद्या आहे. तिच्या साधनेनें मोठमोठीं कार्यें क्षण-मात्रें पार पडतात. तशीच ती फार गंभीर विद्या आहे. कठीणहि तशीच आहे. तिची साधना परिश्रमपूर्वक करावी लागते आणि अनेक वेळां ती फार भययुक्तही वाटते.

परंतु मनुष्य हा विशालबुद्धि प्राणी आहे. त्याला अशक्य असें कांहींच नाहीं. मात्र विश्वास भयंकर पाहिजे आणि सतत तपश्चर्या पाहिजे. अखंड साधनेनें ही विद्या मानवास निश्चितपणें साध्य करतां येते, आणि अशी ही उपादेय विद्या सर्व मानवांनीं अखंड परिश्रम करून मिळविलीच पाहिजे.

पूर्वी माझा परमशिष्य लंकापति रावण ह्यानें ही सर्व विद्या साध्य केली होती. पण ती त्र्ययुगांतील घटना आहे. आतां कलियुग चालू आहे. सध्या बरेच लोक पाखंडी झाले आहेत. त्यामुळें त्यांचा ह्या विद्येवर विश्वास नाहीं. तसेंच ही विद्या 'गुप्तविद्या' असल्यामुळें बऱ्याच लोकांना तिचें ज्ञान सहजप्राप्य नाहीं. त्यामुळें पाखंडी लोक ह्या विद्येची निंदा करीत असतात. ते स्वतः योग्य साधना करीत नाहींत, अनुभवही घेत नाहींत. त्यामुळें त्यांना ह्या विद्येंतील शक्तीची कल्पना येत नाहीं.

इंद्रजाल विद्या ही फार गहन विद्या आहे. त्यामुळें ती गुरूविना प्राप्त होऊं शकत नाहीं. इंद्रजाल विद्येच्या प्राप्तीसाठीं योग्य गुरु शोधला पाहिजे व त्याला शरण गेलें पाहिजे. ह्या गुरुविद्येची साधना फार कठीण आहे. ती साध्य करतांना अनेक वेळां अभ्यासकावर अनेक संकटें कोसळतात. साधक बेशुद्ध होऊन तो अचेतन होतो. कधीं कधीं त्याला दारुण दारिध्र येतें. कधीं तो भयंकर आजाराच्या संकटांत सांपडतो. अनेक संकटें त्यांच्यावर येतात. कधीं कधीं मृत्यु येण्यापर्यंतही महासंकट त्याच्यावर कोसळतें.

अशावेळीं गुरु त्याचें रक्षण करतो. तो त्याचीं सर्व विघ्नें निवारण करतो, व त्याला योग्य मार्ग दाखवून पूर्ण विद्या त्याला देतो.

गुरूची राहणी नेहमीं साधी असते. तो शांत व सात्त्विक असतो. तो फार गंभीर असतो. कारण इंद्रजाल विद्या ही विद्या मुळांतच फार गंभीर आहे. तो स्थायी असतो. चंचल असून त्याला चालत नाहीं. तो नेहमीं नियमपूर्वक राहतो. त्याचा आपल्या विद्येवर पूर्ण विश्वास असतो.

गुरूचें जीवन नेहमीं परोपकारी असतें. तो तपस्वी असतो. बालब्रह्मचारी असतो. तो विद्यार्थी असतो. कारण मनुष्य हा मृत्युपर्यंतसुद्धां पूर्ण ज्ञानी होऊं शकत नाहीं. त्यानें अखेरपर्यंत ज्ञानप्राप्तीचा सतत प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. स्वभावानें तो सज्जन असून सर्वांना आदरणीय असतो.

इंद्रजाल विद्येची साधना करूं इच्छिणाऱ्या अभ्यासकानें

असा गुरु शोधून त्याच्याकडे राहून त्याची एकनिष्ठपणें सेवा करून कृपा संपादन करावी व आपल्या साधनेला सुरुवात करावी.

हे पार्वती ! गुरु जसा माझा एकनिष्ठ भक्त असावा लागतो तसाच अभ्यासकहि माझा एकनिष्ठ भक्त असावा लागतो. त्याशिवाय ही विद्या त्याला साध्य होत नाहीं. त्या शिष्याची माझ्याप्रमाणेंच गुरूवरहि भक्ति पाहिजे. साधक हा शांत चित्ताचा असावा. तो चंचल असून चालत नाहीं. तो अंतःकरणाचा महासागरासारखा खोल असावा. त्यानें गुरूनें दिलेला गुप्त मंत्र गुरूच्या आज्ञेशिवाय कुणाला सांगता उपयोगाचा नाहीं. तो परान्नपुष्ट नसावा. दान व भिक्षा घेणारा नसावा आणि शुद्ध चारित्र्याचा असावा.

जो कुलीन नाहीं, जो भक्त नाहीं, जो अन्नपाण्यामुळें व्याकुळ आहे, जो चित्तानें अस्थिर आहे, जो भ्रमिष्ट आहे, जो परनिंदा करतो, ज्याला वारंवार शंका येतात, ज्याची गोब्राह्मण व परमेश्वर यांवर निष्ठा नाहीं अशा माणसानें ह्या विद्येची दीक्षा घेऊं नये व त्याला कुणी ती देऊंहि नये. असा देणारा व घेणारा दोघेहि घोर पापांत पडतात.

हे पार्वती ! अशा प्रकारच्या माणसानें कष्टेंकरून प्राप्त केलेली ही विद्या कधींहि असफल होत नाहीं. ती इंद्राच्या वज्रासारखी, यमाच्या पाशासारखी आणि अग्नीच्या दहनशक्तीप्रमाणें निश्चित सफलता देणारी

आहे यांत मुळींच शंका नाहीं.

" षट्कर्म "

हे पार्वती ! मी ही इंद्रजाल विद्या सहा कर्मांत विभागली आहे. (१) शांति कर्म, (२) वशीकरण कर्म, (३) स्तंभन कर्म, (४) विद्वेषण कर्म, (५) उच्चाटन कर्म आणि (६) मारण कर्म अशीं हीं सहा कर्में असून त्यांना ' षट्कर्म ' म्हणतात.

ह्या षट्कर्मांत अनेक प्रयोग करावयाचे असतात. कर्मांची सिद्धि करतांना मंत्राचा जप विधिनुसार करणें अत्यंत आवश्यक आहे. मंत्रसिद्धीच्या मार्गानें, नियमानें आणि विधिपूर्वक साधना केली तर सिद्धि अवश्य प्राप्त होते.

१. शांति कर्म : शांतिकर्माच्या सिद्धीनें सर्व प्रकारचे रोग, वाईट कार्य व पापग्रहांची शांति होते; व त्याचे अनिष्ट परिणाम नाहींसे होतात.

२. वशीकरण कर्म : वशीकरण कर्माच्या सिद्धीमध्यें इतरांना आकर्षित करून घेण्याची शक्ति असते.

३. स्तंभन कर्म : स्तंभन कर्माच्या सिद्धींत सर्व प्रकारचे प्राणी व वस्तु एखाद्या जागीं स्थिर करण्याची शक्ति असते. एकदां ती वस्तु अगर प्राणी स्थिर केला म्हणजे तेथून हलूं शकत नाहीं.

४. विद्वेषण कर्म : विद्वेषण कर्माच्या सिद्धीनें दोन व्यक्तींत विद्वेषण म्हणजे विरोध निर्माण होतो. म्हणून

कोणत्याहि दोन व्यक्तींत बेबनाव निर्माण करण्यासाठीं विद्वेषण कर्माचें साधनतंत्र वापरतात.

५. उच्चाटण कर्म : उच्चाटण कर्माच्या सिद्धीनें दोन प्रेमी जीवांत विरोध करून त्यांना एकमेकांपासून दूर करतां येतें. साधक ह्याच कर्मसिद्धीच्या मार्गानें दुसऱ्यावर विजय प्राप्त करतो.

६. मारण कर्म : मारण कर्माच्या सिद्धीनें एखाद्याचे प्राण हरण करण्याची शक्ति येते. परंतु ह्या कर्माची सिद्धि लोककल्याणार्थच उपयोगांत आणावी.

इंद्रजाल शास्त्राचा असा संकेत आहे कीं ह्या शास्त्राच्या साधनेंत वेळ, काळ, मुहूर्त, नक्षत्र, व्रत, होमहवन ह्यासंबंधीं कांहीं नियम नाहीं. सिद्धि नियमांत व प्रयोगाच्या मंत्रांत मात्र नियमांचें कांटेकोर पालन झालें पाहिजे परंतु कांहीं शास्त्रज्ञांचें असेंहि मत आहे कीं, जर काळ वेळांची बंधनें पाळलीं गेलीं तर अधिकस्य अधिकम् फलम् ।

मंत्रजप

कोणत्याहि सिद्धीची साधना करतांना त्या त्या सिद्धीच्या मंत्राचा एकाग्रतेनें जप करावयाचा असतो. मंत्रजपाचे एकूण तीन प्रकार आहेत. (१) वाचिक जप, (२) उपांशु जप व (३) मानसिक जप.

(१) जप करतांना मंत्राचा उच्चार दुसऱ्याला ऐकूं येईल इतक्या मोठ्यानें केला तर त्याला वाचिक जप म्हणतात.

(२) मंत्राचा उच्चार केवळ आपला आपल्यालाच ऐकूं येईल, दुसऱ्याला ऐकूं जाणार नाहीं, अशा पद्धतीनें केला तर त्याला उपांशु जप म्हणतात.

(३) आणि मंत्राचा उच्चार केवळ मनांतल्या मनांत केला, ओठ आणि जीभ जरासुद्धां हलत नाहीं अशा पद्धतीनें केला—तर अशा जपाला मानसिक जप म्हणतात.

मानसिक जपांत अक्षर मंत्राला महत्त्व असून त्यांत अक्षरावर पूर्ण लक्ष ठेवायला पाहिजे. हे तिन्ही प्रकारचे जप पापनाशक व सिद्धिदायक आहेत.

ह्या तिन्ही प्रकारच्या जपांत आधीं ॐ काराचें ध्यान करावें व मग जप करावा.


शांति कर्मांत उपांशु जप करावा लागतो. वशीकरण कर्मांत आणि स्तंभन कर्मांत मानसिक जप करावा लागतो आणि मारण कर्म, उच्चाटण कर्म व विद्वेषण कर्म ह्यांत वाचिक जप करावा लागतो.

सत्कार्यासाठीं मानसिक किंवा उपांशु जप करावा आणि इतर कार्यांसाठीं वाचिक जप करावा.

मंत्रजप करतांना मंत्राच्या शेवटीं मारण, उच्चाटण व विद्वेषण कर्मांत " हुं छेदन फट " असें म्हणून मंत्र पूर्ण करावा. इतर कर्मांत जप करतांना मंत्राच्या शेवटीं " हुं फट " असें म्हणून मंत्र पूर्ण करावा, आणि हवन-कार्यांत मंत्राच्या शेवटीं ' स्वाहा ' किंवा ' नमः ' म्हणन मंत्र पूर्ण करावा.

सिद्धि कर्मांतील कोणत्याहि मंत्राची सिद्धि करतांना प्रथम जमिनीवर एक विशिष्ट चक्र चित्रित करावें लागतें. त्याला "कूर्मचक्र" म्हणतात. ह्या चक्राची सिद्धिकर्मांत नितांत जरुरी भासते. त्याशिवाय सिद्धि फलदायी होऊं शकत नाहीं.

कूर्मचक्र



आसन

जमिनीवर वरील कूर्म–चक्र चित्रित करावें व त्यावर कार्यसिद्धिच्या अनुसारानें आसनस्थलावर आसन पसरावें.

शांतिकर्मांत कुशांचें आसन आवश्यक आहे. वशीकरण कर्मांत मेंढ्याच्या कातडीच्या आसनाचा उपयोग करायला पाहिजे. आकर्षण कर्मांत हरिणाच्या चर्माच्या

आसनाचा उपयोग करावा. यक्षिणीसाधन व भूतसाधन कर्मांत काळ्याघोंगडीच्या आसनाचा उपयोग करावा. स्तंभन कर्मांत अश्वचर्माच्या किंवा हरिणचर्माच्या आसनाचा उपयोग करावा. मोहन प्रयोगांतहि हरिणचर्माचा उपयोग करावा. विद्वेषण कर्मांत कोल्ह्याच्या चर्माचें आसन वापरावें. उच्चाटण कर्मांत उंटाच्या कातड्याचें आसन वापरावें. मारण कर्मांत मेंढ्याच्या लोकरीच्या कापडाचें आसन वापरावें. आणि इतर कोणत्याहि कामीं कुशासन वापरावें.

आसन (बैठक)

कर्मचक्रावर वरीलपैकीं योग्य तें आसन पसरून त्यावर साधकानें एका विशिष्ट आसना (बैठकी) वर बसावें आणि मग जपाला सुरवात करावी.

शांतिकर्माच्या सिद्धीसाठीं साधकानें स्वस्तिकासन करावें. वशीकरण कार्य सिद्धीसाठीं भद्रासन करावें. स्तंभन-कर्माच्या सिद्धीसाठीं विकटासन करावें. विद्वेषण कर्माच्या सिद्धीसाठीं कुक्कुटासन करावें. उच्चाटण कर्माच्या सिद्धी-साठीं अर्धस्वस्तिकासन करावें. आणि मारण कर्माच्या सिद्धी-साठीं विकटासन करावें.

कोणत्याहि शुभकर्माच्या सिद्धीसाठीं पद्मासन घालावें आणि कामकलेच्या सिद्धीसाठीं सिंहासन घालावें.

माळ

आसनाच्या सिद्धीबरोबरच माळेची तयारीहि महत्वाची आहे. कर्मसिद्धीच्या निरनिराळ्या प्रयोगांत निर-

निराळ्या प्रकारच्या माळा उपयोगांत आणाव्या लागतात. त्यांतील मणी निरनिराळ्या प्रकारचे असावे लागतात. शांति कर्माच्या सिद्धीमध्यें जपासाठीं मोत्यांच्या मण्यांची किंवा रुद्राक्षांच्या मण्यांची माळ असावी. वशीकरण कर्माच्या सिद्धीमध्यें जपासाठीं पोंवळ्यांची, हिऱ्यांची किंवा रत्नांची माळ आवश्यक आहे. आकर्षण कर्माच्या सिद्धीसाठीं उन्मत्त हत्तीच्या दांतांच्या मण्यांची माळ वापरावी. स्तंभन कर्माच्या सिद्धीसाठीं मोत्यांची माळ वापरावी. विद्वेषण कर्माच्या सिद्धींत घोड्याच्या दांतांच्या मण्यांची माळ वापरावी. उच्चाटण कर्माच्या सिद्धीसाठीं घोड्याच्या दांतांच्या मण्यांची माळ वापरावी. आणि मारणकर्मांत युद्धाशिवाय इतर कोणत्याहि कारणानें मृत झालेल्या माणसाच्या दांतांच्या मण्यांची माळ वापरावी, किंवा गाढवाच्या दांतांची मण्यांची माळ वापरावी.

धर्म, अर्थ व काम ह्यांच्या सिद्धीसाठीं शंख, मोत्यें किंवा पवित्र वस्तूच्या मण्यांची माळ वापरावी. सर्व कामनासिद्धीसाठीं कमलाक्षांची माळ वापरावी. आणि सर्वसिद्धीसाठीं रुद्राक्षांची माळ वापरावी. तसेंच विद्यादेवी सरस्वतीच्या साधनेसाठीं स्फटिक, मोत्यें, पोवळीं किंवा पुत्रजीवक ह्यांची माळ वापरावी, म्हणजे सिद्धि प्राप्त होते.

माळांचा दोरा

वर वर्णन केल्याप्रमाणें त्या त्या मण्यांच्या माळा त्या त्या कर्मसिद्धीसाठीं वापरतांना त्यांतील दोरासुद्धां विशि-

ष्टच असला पाहिजे.

शांतिकर्मांत वापरावयाच्या माळेचा दोरा कमळाचा असावा. वशीकरण कर्मांत वापरावयाच्या माळेचा दोराहि कमळाचा असावा. स्तंभन आणि मोहन प्रयोगांत रेशमी दोऱ्यांत ओवलेल्या मण्यांची माळ वापरावी. विद्वेषण कर्मांत वापरावयाच्या माळेचा दोरा माणसाच्या केसांचा तयार करावा. उच्चाटण कर्मांत वापरावयाच्या माळेचा दोरा घोड्याच्या शेपटीच्या केसांचा असावा आणि मारण कर्मांत वापरावयाच्या माळेचा दोरा माणसाच्या नसांच्या तांतीचा केलेला असावा. इतर सर्व शुभकर्मांत वापरावयाची माळ कापसाच्या दोऱ्यांत ओवलेली असावी. दुष्कर्मांच्या सिद्धीसाठी वापरावयाची माळ कमळाच्या दोऱ्यांत ओवलेली असावी.

मणिसंख्या

मणी व दोरा ह्याप्रमाणेंच मण्यांची संख्याहि निरनिराळ्या कर्मांत निरनिराळी असते. शांतिकर्मांत माळेंतील मण्यांची संख्या २७, वशीकरण कर्मांत १५, आकर्षण प्रयोगांत ५७, स्तंभन प्रयोगांत व मोहन प्रयोगांत १०८, विद्वेषण प्रयोगांत ३१, उच्चाटण प्रयोगांत २९, मारण प्रयोगांत १००, आणि इतर सर्व प्रयोगांत माळेंतील मण्यांची संख्या १०८ असावी.

अंगुलि नियम

शांति कर्मांत व वशीकरण कर्मांत आंगठा व मध्यमा

यांनीं मंत्रजप करावा. आकर्षण कर्मांत आंगठा व अनामिका ह्यांनीं माळ जपावी. स्तंभन कर्मांत आंगठा व मध्यमा यांनीं माळ जपावी. विद्वेषण व उच्चाटण कर्मांत आंगठा व तर्जनी यांनीं माळ जपावी. मारणकर्मांत आंगठा व कनिष्ठिका यांनीं माळ जपावी. शक्तिकर्मांत आंगठा व मध्यमा यांनीं माळ जपावी.



एवढी तयारी झाल्यावर मग मंत्रजपाच्या तयारीला लागावें. त्यासाठींसुद्धां कांहीं नियम पाळणें आवश्यक आहे.

दिशा नियम

कोणत्या कर्मसिद्धींत कोणत्या दिशेकडे तोंड करून

आसन मांडावें हेंहि महत्वाचें आहे.

शांतिकर्मांत उत्तराभिमुख आसन मांडून जप करावा. वशीकरण कर्मांत व स्तंभन कर्मांत पूर्वाभिमुख आसन मांडून जप करावा. विद्वेषण कर्मांत नैऋत्य दिशेला तोंड करून जप करावा. उच्चाटण कर्मांत वायव्य किंवा दक्षिण दिशेला तोंड करून जप करावा आणि मारण कर्मांत दक्षिण दिशेला तोंड करून जप करावा. धनप्राप्तीसाठीं पश्चिमेकडे तोंड करून जप करावा. आयुष्यवर्धन व पुष्टिकर्म यांच्या सिद्धी-साठीं उत्तराभिमुख होऊन जप करावा. (दिशा-ज्ञान कूर्म चक्रावरून होईल.)

इष्टदेवता

प्रत्येक कर्माची एक इष्ट देवता आहे व तिचें मनोभावें एकाग्रतेनें ध्यान केलें पाहिजे, म्हणजे ती देवता प्रसन्न होते व आपल्याला लवकर सिद्धि देते. ज्या कर्मासाठीं सिद्धि करावयाची असेल त्या कर्माच्या इष्ट देवतेची प्रथम पूजा करावी व मगच जपतपाला सुरवात करावी.

शांतिकर्माची इष्टदेवता " मंगला " आणि " सर-स्वती " आहे, वशीकरण कर्माची इष्टदेवता " रति " आहे. स्तंभनकर्माची इष्टदेवता " लक्ष्मी " आहे; विद्वेषण कर्माची इष्टदेवता " दुर्गा " आहे आणि मारण कर्माची इष्टदेवता " भद्रकाली " आहे.

इष्टकाल

कोणत्या कर्माची सिद्धि कोणत्या वेळीं करावी हेंहि

ठरलेलें आहे. शांति कर्माची साधना प्रथम प्रहरांत करावी. वशीकरण कर्माची साधना दुसऱ्या प्रहरांत करावी व स्तंभन कर्माची चौथ्या प्रहरांत करावी. विद्वेषण आणि उच्चाटण कर्माची साधना तिसऱ्या प्रहरांत करावी आणि मारण कर्माची साधना चौथ्या प्रहरांत करावी.

इष्टऋतु

विविक्षित कर्माची साधना विविक्षित ऋतूंतच करावयाची असते. शांतिकर्माची साधना हेमंत ऋतूंत करावी; वशीकरण कर्माची साधना वसंत ऋतूंत करावी; स्तंभन कर्माची साधना शिशिर ऋतूंत करावी; उच्चाटण कर्माची साधना वर्षा ऋतूंत करावी आणि मारण कर्माची साधना शरद ऋतूंत करावी.

इष्टवर्ण

विविक्षित कर्माची साधना करतांना विविक्षित रंगाच्या वस्तु वापराव्या लागतात व त्याच रंगाचें चिंतन करावें लागतें.

शांतिकर्माच्या साधनेंत वस्त्रें पांढरीं शुभ्र असावीं. इतर वस्तुसुद्धां पांढऱ्याच असाव्या, व चिंतनहि पांढऱ्या रंगाचेंच करावें. वशीकरण कर्माच्या सिद्धींत लाल रंगाचें वातावरण असावें. स्तंभन कर्मांत पिवळा रंग सर्वव्यापी असावा. विद्वेषण कर्मांत लाल रंगाच्या सर्व वस्तु असाव्या.

उच्चाटण कर्मांत धुरकट रंगाच्या सर्व वस्तु असाव्या आणि मारण कर्मांत काळीं वस्त्रें व वस्तु असून काळ्या रंगाचें चिंतन असावें.

इष्ट दिन

इंद्रजाल सिद्धींत दिवसांचाहि नियम पाळावा लागतो. शांतिकर्माच्या साधनेला सोमवारीं सुरवात करावी. वशीकरण कर्माच्या सिद्धीला बुधवारीं सुरवात करावी. स्तंभन कर्माच्या सिद्धीला शनिवारीं सुरवात करावी. विद्वेषण कर्माच्या सिद्धीला मंगळवारीं सुरवात करावी. उच्चाटण कर्माच्या सिद्धीला व मारण कर्माच्या सिद्धीला शनिवारीं आरंभ करावा.

इष्ट तिथि

शांति कर्माची साधना तृतीयेला किंवा द्वादशीला सुरू करावी. वशीकरण कर्माच्या सिद्धीला त्रयोदशीला आरंभ करावा. स्तंभन कमाची साधना प्रतिपदेला सुरू करावी; विद्वेषण कर्माची साधना षष्ठीला सुरू करावी; उच्चाटण कर्माची साधना चतुर्थीला सुरू करावी आणि मारण कर्माची साधना वद्य चतुर्थीला सुरू करावी.

इष्ट नक्षत्र

तिथीप्रमाणेंच नक्षत्रांचाहि नियम पाळावा. शांति

कर्माची साधना उत्तरा किंवा रोहिणी नक्षत्रावर सुरूं करावी; वशीकरण कर्माची साधना ज्येष्ठा नक्षत्रावर सुरूं करावी; स्तंभन कर्माची साधना विशाखा नक्षत्रावर सुरूं करावी; विद्वेषण कर्माची साधना आर्द्रा नक्षत्रावर सुरूं करावी; उच्चाटण कर्माची साधना आश्लेषा नक्षत्रावर सुरूं करावी आणि मारण कर्माची साधना भरणी नक्षत्रावर सुरूं करावी.

मार्जन मंत्र

साधना मंत्राचा जप करण्याआधीं पुढील मार्जन मंत्रानें आपल्या डाव्या हाताच्या तळहातावर पाणी घेऊन ह्या मंत्रानें प्रत्येक अवयवाला स्पर्श करावा.

बीज मंत्र :–ॐ क्षा हृदयाय नमः

ॐ क्षी शिरसे स्वाहा ।
ॐ ऱ्हीं शिखाय वौषट् ।
ॐ ऱ्हूं कवचाय हुम् ।
ॐ क्रों नेत्रत्रया वो फट् ।
ॐ क्रों अस्त्राय फट् ।
ॐ क्षा, क्षी ऱ्हीं ऱ्हूं क्रों क्रों फट् स्वाहा ।

हवन

कर्म सिद्धीमध्यें हवनविधीसुद्धां शीघ्रफलदायी असून तो जरूर करावा. शांतिकर्मांत तीळ, तूप, दूध आणि आंब्याच्या

समिधांचें हवन करावें. वशीकरण कर्मांत मोहरीचें हवन करावें. आकर्षणकर्मांत तेल व मोहरी यांचें हवन करावें. स्तंभनकर्मांत तूप व बेलपत्र यांचें हवन करावें. विद्वेषण-कर्मांत व उच्चाटणकर्मांत चारोळी व बेलांतील मगज यांचें हवन करावें. आणि मारणकर्मांत तेल व मोहरी यांचें हवन करावें. पुष्टिकर्मांत तूप व बेलपत्राचें हवन करावें. धनप्राप्तीसाठीं धूप, खीर आणि मेवामिठाई यांचें हवन करावें. कोणत्याहि शुभ कर्माच्या सिद्धींत तूप, तीळ व तांदूळ यांचें हवन करावें. आणि इतर कोणत्याहि कर्मांत तूप, देवदारू, मेवा आणि जवस यांचें हवन करावें.

मुद्रा

हवन करतांना मुद्राहि निश्चित करणें आवश्यक आहे. मुद्रा तीन प्रकारची असते. (१) सूकरी (२) हंसी व (३) मृगी.

सूकरी मुद्रेमध्यें हाताला वाकवून होम करावा लागतो. हंसी मुद्रेमध्यें कनिष्ठिकेच्या स्पर्शाशिवाय होम करावा लागतो आणि मृगी मुद्रेमध्यें कनिष्ठिका आणि तर्जनीनेंच होम करावा लागतो. शुभ कर्मासाठीं करावयाच्या होमांत हंसी आणि मृगी मुद्रा उपयोगांत आणावी आणि अशुभ कर्मांत सूकरी मुद्रा उपयोगांत आणावी.

कुंभ-स्थापना

शांतिकर्माच्या सिद्धींत नवरत्नांनीं अलंकृत सोन्याच्या कलशाची स्थापना करावी. वशीकरणकर्मांत, आकर्षण कर्मांत, स्तंभनकर्मांत आणि मोहनकर्मांत चांदीच्या कलशाची स्थापना करावी. विद्वेषण कर्मांत आणि उच्चाटण कर्मांत मातीच्या भांड्याचा कलश करावा आणि मारण-कर्मांत लोखंडी कलशाची स्थापना करावी. इतर सर्व सिद्धींत तांब्याचा कलश स्थापन करावा.

कांहीं नियम

साधना चालू असतांना मंत्र अगोदर कागदावर अनेक वेळां लिहून काढावा. तो पाठ करावा, त्यांत कांहीं चूक राहतां उपयोगी नाहीं.

साधना चालूं असतांना ब्रम्हचर्य पालन करावें. जमिनी-वर झोंपावें. इष्टदेवतेचें ध्यान करीत असावें म्हणजे सिद्धि लवकर प्राप्त होते.

———————